# संपादकीय

## मराठवाडा 'मुक्तीसंग्राम' आणि मागासलेपणाचे स्थायीकरण

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; परंतु मराठवाडा हा निझामाच्या राजवटीपासून १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झाला. मराठवाड्याच्या निझाम राजवटीविरोधातील चळवळ ही 'हैदराबाद मुक्तीसंग्राम' चळवळ म्हणून ओळखली जाते. वास्तवात स्वातंत्र्य आणि मुक्ती ह्या दोन भिन्न संकल्पना आहेत. 'मुक्ती' या संकल्पनेमध्ये अधिक मूलगामी असे राजकीय-आर्थिक परिवर्तन अपेक्षित असते. उदाहरणार्थ, मराठवाडा 'मुक्तीसंग्रामा'च्या एक वर्षानंतर चीनमध्ये जे घडले त्याला 'मुक्ती' असे संबोधले गेले होते. चीनमधील 'मुक्ती'लढ्यात जुन्या सामंती व्यवस्थेला नष्ट केले जाणे अपेक्षित होते. चीनचा 'मुक्ती'लढा केवळ एक राजवट जाऊन दुसरी राजवट येणे इथपर्यंत सीमित नव्हता.

मराठवाड्यात काय घडले? १९४८पूर्वी मराठवाडा जवळपास सात शतकांहून अधिक काळ हा सामंती राजवटीखाली होता. हैदराबादचा शेवटचा निझाम हा या सामंती राजवटीतील शेवटचा राज्यकर्ता होता. तरीही 'मुक्ती' या शब्दाला साजेसा असा जुन्या सामंतशाहीविरोधी लढा या काळात लढला गेलाच नाही. निझाम राजवटीत मराठवाड्यात रयतवारी आणि जमीनदारी अशा दोन प्रकारच्या जमीनधारणा निझामाकडून विकसित करण्यात आलेल्या होत्या. पहिल्या प्रकारात शेतीची मालकी कुळ / शेतकऱ्यांकडेच ठेवण्यात आली होती; तर दुसऱ्या प्रकारात विशिष्ट अशी शेकडो आणि हजारो एकरचे मालक असलेल्या जमीनदारांची जमीनदारशाही तयार करण्यात आली होती. पहिल्या प्रकारच्या जमीनधारणेचा हळूहळू लोप होऊन ब्राह्मण व व्यापारी जातींकडे जमीनीचे हस्तांतरण झाले आणि सावकारांची सत्ता आणि जरब वाढली आणि दुसऱ्या प्रकारच्या जमीनधारणेतून विशिष्ट अशा प्रकारची जात-जमीनदारशाही निर्माण झाली. निझामाच्या विरोधात जे आंदोलन सुरू झाले त्याचे टोक हे मराठवाड्यात निर्माण झालेल्या या आंतरिक सामंती अर्थव्यवस्थेच्या विरोधाकडे वळविण्यात आले नाही. ज्या आर्य समाजाने या दोन्ही 'मुक्तीसंग्रामां'चे नेतृत्त्व केले त्या आर्य समाजालादेखील जमीनदारशाहीविरोधाच्या राजकीय कृतीचे भान नव्हते. तेलंगणा प्रदेशात ज्याप्रमाणे डाव्या चळवळीच्या नेतृत्त्वाखाली जमीनदारशाहीविरोधी लढा १९४८मध्ये लढण्यात आला; तसा लढादेखील मराठवाड्यात लढला गेला नाही.

याचा एक अपरिहार्य परिणाम असा राहिला की, मराठवाड्यात विशिष्ट अशा स्वरूपाचे मागासलेपण हे टिकून राहिले. आज मराठवाड्याचा अंतर्भाव हा भारतातील सर्वाधिक मागासलेपणा असलेल्या प्रदेशांत केला जातो. मराठवाड्यातील जनतेचे दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्रातील (ज्यामध्ये कोकण आणि विदर्भ या दोन भूप्रदेशांचा अंतर्भाव आहे) दरडोई उत्पनाच्या निम्मे आहे. केंद्र सरकारने केलेल्या एका पाहणीत भारतातील सर्वाधिक मागासलेपण असलेल्या १०० जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील सर्वच ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. औरंगाबाद शहरालगतची औद्योगिक वसाहत सोडल्यास संपूर्ण मराठवाड्यात नोंद घेण्यासारखी औद्योगिक वसाहत नाही. जालना, बीड, उस्मानाबाद, हिंगोली जिल्ह्यांमध्ये एकही महानगरपालिका नाही.

नांदेड, परभणीसारख्या शहरांचा तोंडवळा आजदेखील सामंती / ग्रामीण असा आहे. मराठवाड्यातील जवळपास ९० टक्के शेती ही कोरडवाहू आहे.

मराठवाडा हा प्राय: शेतीप्रधान असला तरी, पश्चिम महाराष्ट्रातील आयात केलेले दूधच मराठवाड्यात पिले जाते. दुधाप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी गाळलेली देशी दारू मराठवाड्यात गावोगावी पोहोचविली जाते. ज्याप्रमाणे युरोपच्या विकासास उर्वरित जगातील वसाहतींचे मागासलेपण आणि शोषण जबाबदार होते; त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील विकासास मराठवाड्यातील मागासलेपण जबाबदार आहे! पश्चिम महाराष्ट्रातील ऊसशेती आणि साखर कारखानदारी ही मराठवाड्यातील ऊसतोड कामगारांच्या शोषणाने बरबटलेली आहे, हे सर्वश्रुत आहेच. मराठवाड्याचे मागासलेपण हे पश्चिम महाराष्ट्रातील विकासाची जणू काही पूर्वशर्तच आहे. प्रादेशिक असमतोल विशिष्ट अशा भांडवली विकासाचा अपरिहार्य परिणाम असतो.

असे असले तरी, मराठवाड्यातील सांस्कृतिक अभिजनांना पश्चिम महाराष्ट्र हा मराठवाड्यासाठी आदर्शवत वाटतो. पश्चिम महाराष्ट्रातील किती विद्यापीठांनी मराठवाड्यातील दिग्गजांना डी. लिट्. दिली हे माहिती नाही; परंतु मराठवाड्यातील विद्यापीठांनी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना डी. लिट्. दिली आहे. मराठवाड्यातील अनेक लेखक, पुढारी आणि पत्रकारांना पश्चिम महाराष्ट्राचे मोठे आकर्षण आहे. भांडवली विकासाची कास धरणाऱ्या पुढाऱ्यांची चरित्रे लिहिण्यात मराठवाड्यातील किमान दोन लेखकांनी धन्यता मानली. याच पुढाऱ्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या बहुजातीय तरुणांचे आंदोलन दडपण्यासाठी पूर्वाश्रमीच्या मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या मागणीला फुंकर घालून मराठवाड्याला जातीय दंगलीत ढकलले, असा एक प्रवाद आहे. मराठवाड्याला आता स्वत:चे वृत्तपत्र नाही. 'सकाळ', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकमत', 'पुण्यनगरी', 'देशोन्नती', 'दिव्य मराठी', 'पुढारी' ही वृत्तपत्रे मूळची मराठवाड्याची नाहीत.

आज मराठवाड्याच्या मागासलेपणासाठी प्रबोधन, औद्योगिकीकरण आणि भूसुधारणा यांचा अभाव कारणीभूत आहे. दोन मराठवाडा गीतं सध्या उपलब्ध आहेत. एक गीत हे नांदेडच्या एका कवीने लिहिले आहे आणि त्यात देवगिरीच्या जुलमी राजवटीचा गौरव आहे; दुसरे गीत हे मूळच्या मराठवाड्यातील विलास घोगरे यांचे आहे. या दोन गीतांमध्ये परस्परविरोधी चित्रं आणि भूमिका आहेत. हा एक व्यत्यास आहे. हा व्यत्यास कसा सोडविला जाणार आहे, यावर मराठवाड्याचे भवितव्य अवलंबून आहे. ●

परिवर्तनाचा वाटसरू

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले
वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.